नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३
सरकार वि. संजय वगैरे
निशाणी ३१

दिनांक – ०५/०६/२०२५

शपथेवर पुढील उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे – श्री. एस.टी. जाधव, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

१०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ यांची दोन्ही मुले मुंबई येथे ब–याच वर्षापासून कामधंद्यासाठी राहतात. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी क्र. ३ ची दोन्ही मुले किती वर्षांपासून मुंबई येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ ची मुले सद्या मुंबई येथे राहतात. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. ३ पुर्वी आर्मी मध्ये होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ मुंबई येथे नोकरीस होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण दाखल होण्यापर्वी आरोपी क्र. ३ ची पत्नी मयत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ शेटफळे येथे एकटेच राहतात.

११. निर्मला शहाजी देशमुख माझी बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ साली निर्मला हिने प्रस्तुत प्रकरणातील आरोपींच्या विरुद्ध केस दाखल केली होती. सन २००९ साली मी नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, निर्मला देशमख यांनी सन २००९ साली केलेली केस ही आरोपींनी त्यांना गट क्र. ११२४ मध्ये येऊन काठ्या, कु–हाड्यांनी मारहाण केल्यासंदर्भात होती. हे म्हणणे खरे आहे की, ते प्रकरण आटपाडी न्यायालयात चालले व त्या प्रकरणामधुन आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे.

१२. गट क्र. ११२३ व ११२४ या शेतजमीनीमधील प्रत्येकी वीस गुंठे क्षेत्राबाबत आमचे व आरोपींच्या कुंटूबामध्ये वाद आहेत. गट क्र. ११२४ आमच्या मालकीचा आहे आणि गट क्र. ११२३ हा आरोपी क्र. ३ व त्यांचे भाऊ यांच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ११२३ मध्ये आरोपी क्र. ३ व त्यांचे भाऊ अशा दोघांची पत्र्याची राहती घरे आहेत. माझे शेतजमीनी गट क्र. ११२४ च्या पुर्वेस गट क्र. ११२३ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ११२३ व ११२४ या शेतजमीनींचे एकत्रीकरणाचे प्रकरण झाले आणि आमचे व आरोपी क्र. ३ च्या कुंटूबामध्ये

वाद सुरु झाला. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरणाच्या आदेशाविरुद्ध मंत्रालयापर्यंत प्रकरणे दाखल झाली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र ३ ने मंत्रालयामध्ये आमचे व रामरावच्या भावांविरुद्ध एकत्रीकरणाचे आर.टी एस. प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मंत्रालयातील अपील हे उपसंचालक कार्यालय, पुणे यांच्या आदेशाच्या विरुद्ध केले होते.

**१३.** आमच्यामध्ये व आरोपीमध्ये आमच्याकडून भांडणाचे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत आमचे व आरोपीमध्ये उच्च न्यायालयापर्यंत प्रकरण दाखल झाले आहे. मी उच्च न्यायालयापर्यंतच्या कोणत्याही प्रकरणामध्ये कोणत्याही सक्षम अधिका–यासमक्ष आमचे आरोपींमध्ये जमिनीचा वाद नाही असे लिहून दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आतापर्यंत प्रकरणे सुरु आहेत. हे मला माहिती नाही की, सन २००९ साली निर्मला देशमुख हिने गटामध्ये आरोपी चार चाकीने आले व मारहाण केली अशा आशयाची फिर्याद दाखल केली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये माझी कथने आरोपी घटनेच्या दिवशी चार चाकीने आले असे नमुद केले आहे.

**१४.** मी फिर्याद देताना किंवा न्यायालयासमक्ष साक्ष देताना सदर चार चाकी कोणत्या कंपनीची होती व रंगाची होती याचा तपशील दिला नव्हता. मी पोलीसांना तथाकथीत घटनेतील गाडी 'ही आहे' असे दाखविले नाही. घटनेपासून ते न्यायालयात जबाब होईपर्यंत मी चार चाकी गाडीचे वर्णन नोंदवून घेतले नव्हते. सदर चार चाकी गाडीचा तपशिल नोंदवून घ्यावा आणि न्यायालयात शपथेवर सांगावा असे मला वाटले नाही.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, संजय एकनाथ देशमुख हा माझा मेहूणा आहे व बाळासाहेब सिताराम कदम हा माझा मावस भाऊ आहे. आंबेवाडी हे गाव माझ्या गावापासून अठरा ते वीस किलोमीटर अंतरावर असावे. पिंपरी हे गांव माझ्या गावापासून अंदाजे वीस ते बावीस किलोमीटर अंतरावर असावे. माझ्या गावात इतरांची राहती घरे आहेत. संजय देशमुख व बाळासाहेब कदम यांना पंचनाम्यासाठी कोणी बोलाविले हे मला

सांगता येणार नाही. घटनेनंतर मी अगर माझ्या घरातील इतरांनी संजय देशमुख व बाळासाहेब कदम यांना घटनेबाबत कल्पना दिली नव्हती. मी ०७ तारखेला घरी आल्यानंतर माझ्या घरच्यांनी पोलीस पंचनाम्याकरीता आले होते असे सांगितले. परंतू, पंच संजय देशमुख व बाळासाहेब कदम पंचनाम्यासाठी आले होते असे सांगितले नाही. मी पहिले घटनास्थळ दाखविण्यासाठी पोलीसांसोबत गेलो नव्हतो. मी तपासीक अंमलदार यांना दोन दिवसानंतर समक्ष जावून सांगितले होते की, पहिल्या घटनास्थळाच्या ठिकाणी मला फेकून मारलेली दगडे तेथेच आहेत ती जप्त करा व पंचनामा करा. मला तपासीक अंमलदार यांचे नाव सांगता येणार नाही. मला तपासीक अंमलदारने सांगितले की, पहिल्या जागेचा पंचनामा झाला आहे.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व माझ्या घरच्यांविरुद्ध आरोपींनी याच न्यायालयात फौजदारी प्रकरण (क्रॉस केस –फौ.ख. क्र. १४२/२०२३) दाखल केलेले आहे व ते प्रकरण प्रलंबित आहे व त्यामध्ये आरोपी आहोत. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या केसचे मी अवलोकन केले आहे, वाचले आहे. मी दाखल केलेली केस आणि आम्ही आरोपी असलेली केस या दोन्ही प्रकरणांचे वाचन मी सदर दोन्हीही प्रकरणे न्यायालयात दाखल झाल्यानंतर वाचली आहेत. हे माझ्या लक्षात आले नाही की, मी कलेल्या प्रकरणामध्ये पहिल्या घटनेचा पंचनामा पोलीसांनी केलला नाही. मी साक्ष देण्यापूर्वी सरकारी अभियोक्त्यास पहिल्या घटनेबाबतचा पंचनामा आहे का, याबाबत विचारणा केली नाही. मला न्यायालयासमक्ष दाखल असलेला पंचनामा वाचायचा नाही.

**१७.** मी पोलीस स्टेशनला अंदाजे ९.०० ते ९.३० च्या दरम्यान पोहोचलो होतो. माझ्यासोबत भाऊ बाळासाहेब संभाजी गायकवाड व वडील संभाजी परसू गायकवाड असे होते. आम्ही दुचाकीवरुन गेलो होतो. आमच्या घरातील व्यक्तीनी आम्हाला झालेल्या जखमांवर कपडा बांधला होता. असे घडले नाही की, तो कपडा डॉक्टरांनी काढल्यानंतर आमच्यासमक्ष पोलीसांच्या ताब्यात दिला. आमच्या दोघांच्या अंगावर त्यादिवशी असलेले कपडे पोलीसांनी जप्त केले नाहीत. आम्ही पोलीस स्टेशनला गेल्यानंतर पोलीस ठाणे अंमलदारांना भेटलो. मी ठाणे अंमलदाराला पूर्ण

घटना नमुद केली नाही. ठोण अंमलदार यांनी आम्ही त्यांना सांगितलेली घटना लिहून घेतली नाही. साक्षीदार सांगतात की, ठाणे अंमदार यांनी दवाखान्यात जाण्याची यादी दिली. हे मला सांगता येणार नाही की, आम्ही फिर्याद देण्याकरीता पोलीस स्टेशनला किंवा दवाखान्यात गेलो त्यावेळी आरोपी पोलीस स्टेशनमध्ये होते किंवा कसे.

१८. शेटफळे ते आटपाडी हे अंतर तेरा किलोमीटर आहे. आम्ही दवाखान्यातून पुन्हा पोलीस स्टेशनल अंदाजे चार तासाने आलो असावेत. मी डॉक्टरांना घटनेचा प्रकार सांगितला होता. मी डॉक्टरांना कोणी जखमा घडविल्या त्यांची नावे सांगितली नाहीत. डॉक्टरांनी माझ्या वडीलांची तपासणी केली होती. माझे डॉक्टरांशी वैर नाही. सांगली येथील हॉस्पीटल मध्ये काही औषोधोपचार झाले नाहीत. सांगली येथील डॉक्टरांनी मिरज येथील सरकारी दवाखान्यात जाण्याची चिठ्ठी दिली व तेथे गेल्यानंतर माझे व माझ्या भावाचा सी.टी. स्कॅन करण्यात आले. सी.टी. स्कॅनचा रिपोर्ट माझ्या वाचण्यात किंवा पाहण्यात आला नाही. मी पोलीसांना माझा सी.टी. स्कॅनचा रिपोर्ट आणला आहे का, याबाबत विचारणा केली नाही. माझ्या लक्षात नाही की, माझा सी.टी. स्कॅनचा रिपोर्ट प्रकरणात दाखल नाही किंवा कसे.

१९. मी पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी ठाणे अंमलदार यांनी मला असे सांगितले नाही की, आमच्याविरुद्ध रामराव गायकवाड यांनी गुन्हा क्र. २२४/२०२१ दाखल केला आहे. मी पहिल्यांदा पोलीस स्टेशनमध्ये गेलो त्यावेळी जे ठाणे अंमलदार होते तेच ठाणे अंमलदार मी दवाखान्यातून पुन्हा पोलीस स्टेशनला गेल्यानंतर ड्युटीवर होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याविरुद्ध दाखल झालेला गुन्हा क्र. २२४/२०२१ मध्ये भा.दं.वि. कलम ३२६, ३२४, ४५२, १४९, १४१, १४७ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा नोंद झाला आहे. मला किंवा आमच्या घरच्यांपैकी कोणालाही पोलीसांनी त्या रात्री मिरज येथे येऊन अटक केली नाही. मला अंदाजे एक महिन्यानंतर पोलीसांनी अटक केली असावी. पोलीसांनी आम्हा चौघांना अटक केली व माझ्या आई– वडीलांना अटक केली नाही.

**२०.** घटनेच्या दिवशी आरोपी क्र. ३ व ४ यांनी किती अंतरावरुन दगडफेक केली होती ते अंतर मी पोलीसांना फिर्याद देताना सांगितले नव्हते. मला दगड लागलेला नाही. हे मला सांगता येणार नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी क्र. ३ यांची शारिरीक परिस्थिती चालणे, फिरण्याची नव्हती अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ न्यायालयात काठी घेऊन आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ गावात काठी घेऊन फिरतात. मी आरोपी क्र.३ व ४ तसेच इतर आरोपींना तुम्ही दगड का मारता, असे म्हणून प्रतिकार केला नाही. दिनांक ०६/०६/२०२१ रोजी आमचे व आरोपींमध्ये मारामारी होण्याचे कोणतेही कारण घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी सकाळी किंवा आदल्या दिवशी आमचे व आरोपींमध्ये बाचाबाची किंवा कुरापतीच्या कारणावरुन वाद झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ साली मंत्रालयात झालेल्या निकालानंतर सन २०२१ पर्यंत आमचे व आरोपींमध्ये वैयक्तीक वाद झाले नव्हते. आरोपींनी माझ्यावर अंदाजे दोन ते तीन मिनीटे दगड भिरकाविले होते. पोलीसांनी मला दगड का लागला नाही, याचे कारण विचारले नाही. मी घटनेनंतर शेतात गेलो त्यावेळेस माझ्याकडे भिरकावून मारलेले दगड मला तेथे दिसत होते. मला दगड दिसल्यानंतर मी पोलीसांना जाऊन ते दगड पंचनाम्याआधारे जप्त करा असे सांगितले नाही. दगड भिरकाव असताना मी आरोपींना दगड भिरकाविण्याचे कारण विचारले नाही.

**२१.** घटनेनंतर मी माझ्या घरी पावणे सहा वाजता गेलो. घरी आल्यानंतर घटनेबाबत कोणालाही सांगितले नाही. मी घरी घटना कोणालाही न सांगण्याचे काहीही कारण नाही. पाच वाजता घडलेली अनपेक्षीत घटना माझ्या दृष्टीने मला चुकीची वाटत होती. माझ्याबरोबर वाईट झालेल्या गोष्टी कुटूंबातील व्यक्तीना सांगण्याची मला सवय आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला आटपाडी पोलीस स्टेशनला जाणे व फोनवरुन कळविणे शक्य होते. मी पोलीस स्टेशनला न जाणे व फोनवरुन पोलीस स्टेशनला न कळविण्याचे कारण म्हणजे आरोपींचे असे प्रकार ते नेहमीच करीत असतात. हे म्हणणे खरे आहे की, रोज होते त्याप्रमाणेच आजही तसेच झाले म्हणून मला आरोपींचा राग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताच्या आजूबाजूला शेतजमीनी आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, त्या शेजारच्या शेतजमीनींमध्ये लोक काम करीत असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी कथन केलेल्या पहिल्या घटनेबाबत माझ्या शब्दांव्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, गणपती यशवंत गायकवाड हे माझ्या घराशेजारी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोर व बाजूला सरकारी रस्ता आहे. माझ्या घराला उत्तरेला व दक्षिणेला असे एक–एक दार आहे. माझ्या घराच्या पश्चिम दिशेला घरे आहेत पण त्यामध्ये कोणी राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरासमोर उत्तर दिशेला रस्त्याला लागून छाया ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दुकानासामोर आमच्या घराकडे तोंड करुन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोर संभा कोळी व दत्ता कोळी यांची घरे आहेत. साक्षीदार सांगातात की, त्या घरामध्ये कोणीही राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, भारत पाटील व शहाजी पाटील हे माझे नातेवाईक आहेत. साक्षीदार सांगतात की, भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराला लागून भारत पाटील व शहाजी पाटील यांची घरे नाहीत. माझे व भारत पाटील, शहाजी पाटील यांच्या घराच्या मध्ये राहती घरे नाहीत. आमच्या घरात आरडाओरडा झाल्यास त्याचा आवाज गणपती गायकवाड यांच्या घरामध्ये जात नाही. आमच्या घरात आरडाओरडा झाल्यास त्याचा आवाज शहाजी पाटील व भारत पाटील यांच्या घरात जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, भारत पाटील व शहाजी पाटील यांची घरे माझ्या घराला लागून नाहीत. मी फिर्यादीमध्ये भारत पाटील व शहाजी पाटील यांची घरे माझ्या घराच्या शेजारी आहेत असे लिहण्याचे कोणतेही कारण नाही. असे घडले नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष भारत पाटील व शहाजी पाटील यांचा जबाब नोंदविला. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणामध्ये भारत पाटील व शहाजी पाटील यांची साक्ष नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणामध्ये बाळासाहेब, संजय, सुवर्णा, प्रियांका, सुमन, संभाजी आणि बाळासाहेब अशांची साक्ष नोंदविली आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे सर्व लोक माझ्या घरातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळे गावातील वर नमुद केलेल्या लोकांव्यतिरीक्त इतर कोणाचीही साक्ष या प्रकरणात नोंदविलेली नाही.

२३. संध्याकाळी ८.०० वाजताच्या सुमारास मी मारेक–यांना पहिल्यांदा अंदाजे सात फुट अंतरावर पाहिले असावे. मी त्यांना पहिल्यांदा पाहिल्यानंतर, मी त्यांना बोललो. माझ्या कुटूंबातील इतर व्यक्ती त्यांना बोलल्या. मी त्यांना 'येथे पुन्हा का आला,' असे विचारले असता, त्यांनी प्रतिउत्तर दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि मारेक–यांच्या बोलण्यामधून विषय समजून येत होता. हे म्हणणे खरे नाही की, एकत्रीकरणाच्या कारणावरुन दिनांक ०६/०६/२०२१ रोजी संध्याकाळी ५.०० व संध्याकाळी ८.०० वाजता घटना घडली असे फिर्याद व न्यायालयासमक्ष नमुद केले नाही. सदर बाब माझ्या फिर्याद व निशाणी ३४ मध्ये नमुद नसण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

२४. हे म्हणणे खरे आहेक की, फिर्याद देताना कोणाच्या हातात काठी होती, कोणाच्या हातात कु–हाड होती ही बाब स्पष्टपणे नमुद केली नाही. असे म्हणणे योग्य होणार नाही की, माझ्या फिर्यादमधील वाक्यानुसार पाचही आरोपींच्या हातात काठ्या आणि कु–हाडी होत्या असा अर्थ काढणे योग्य होईल. हे म्हणणे खरे आहे की, किती लोकांच्या हातात काठ्या होत्या किती लोकांच्या कु–हाडी होत्या हे मी फिर्याद देताना नमुद केले नाही.

२५. मी वैद्यकीय अधिकारी यांना माझ्या डोक्यात झालेली जखम कु–हाडीने झाली आहे असे सांगितले होते. पोलीसांनी मला कधीही काठी आणि कु–हाड दाखविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कु–हाड वेगवेगळ्या प्रकारांची असते. हे म्हणणे खरे आहे की, कु–हाडींचा आकार वेगवेगळा असतो. माझ्या म्हणण्यानुसार मारेक–यांनी मला कु–हाड धार असलेल्या बाजूने मारलेली होती. मला त्या बाजूने कु–हाडीने एकदा आघात केला. मला जोरात कु–हाडीने मारहाण झाली होती. मी डॉक्टरांना विचारले नाही की, मला झालेली जखम कु–हाडीची आहे किंवा नाही. असे घडले होते की, कु–हाडीच्या घावामुळे माझ्या डोक्यातून रक्त वाहत होते, रक्ताने माझे कपडे भरले होते. माझ्या डोक्यामधील रक्त घरामध्ये पडले नव्हते. मी पोलीसांना रक्ताने भिजलेले कपडे दिले नाहीत. मला माझ्या कपड्यांवर सांडलले रक्त महत्वाचे आहे असे वाटत होते. मला

माझ्या डोक्याच्या उजव्या बाजुला मारले होते. असे घडले नाही की, मी बेशुद्ध पडलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या डोक्यावर झालेली जखम कु–हाडीची जखम नाही.

२६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी माझे व माझ्या कुटूंबातील सदस्यांच्याविरुद्ध आम्ही त्यांच्या घरामध्ये घूसून गज, लाकूड व काठीने त्यांना मारहाण केली, अशा आशयाची तक्रार दाखल केलेली आहे. माझ्या कुटूंबातील महिलांना उपचाराकरीता दवाखान्यात नेले नव्हते. असे घडले नाही की, मी तक्रार दाखल केल्यानंतर पोलीसांकडे मी जाऊन माझ्याविरुद्ध आरापीने दाखल केलेल्या तक्रारीमध्ये आरोपींना जखमा कशा झाल्या, त्याचा खुलासा मी पोलीसांना दिला. मी तक्रार दाखल करण्यासाठी गेलो त्यावेळेस पोलीसांनी मला असे सांगितले नाही की, आरोपींनाही जखमा झाल्या आहेत.

२७. रामराव गायकवाड यांनी त्यांच्या हातातील काठीने माझ्या डोक्यात व पाठीवर किती मिनीटे मारहाण केली, ती निश्चित वेळ मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, मारेकरी माझा भाऊ बाळासाहेब व वडील संभाजी यांना किती वेळ काठ्याने मारहाण करीत होते. मला तीन जखमा झाल्या होत्या. मी पोलीसांना असे सांगितल नव्हते की, मला डोक्यात काठीने मारहाण केली होती. माझ्या फिर्यादीमध्ये आणि सरतपासामध्ये 'डोक्यात काठीने मारले' असे का नमुद केले आहे, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझ्या पाठीच्या डाव्या बाजुला मध्यभाग सोडून डाव्या बाजूला काठीचा मार लागला होता. मला माझ्या शरीराची डावी आणि उजवी बाजू समजते. माझ्या वडीलांचे वैद्यकीय प्रमाणपत्र माझ्या पाहण्यात व वाचण्यात आले नाही. मी फिर्याद देताना माझ्या वडीलांच्या पाठीत नेमक्या कोणत्या ठिकाणी मारहाण झाली, हे नमूद केले नव्हते. माझ्या माहितीनुसार काठीचे फटके जोरजोरात दिले होते. असे घडले होते की, माझा भाऊ बाळासाहेब याच्या कपड्यांवर त्याचे रक्त सांडले होते. माझ्या वडीलांच्या अंगावर रक्त सांडले नव्हते. बाळासाहेबाचे रक्ताचे कपडे पोलीसांनी जप्त केले नाहीत. असे घडत होते की, माझ्या भाऊ बाळासाहेब व वडीलांना एका पाठोपाठ एक

काठीने सलग मारहाण होत होती. मी माझ्या वडीलांच्या पाठीवर काठीचे व्रण पाहिले होते.

२८. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी ८.३० ते ८.३० च्या दरम्यान मी व माझ्या कुटूंबातील व्यक्ती आरोपींच्या घरात घुसलो व त्यांना गज, लाकूड व काठ्यांनी मारहाण केली. असे घडले नाही की, तथाकथीत घटनेमध्ये झटापटी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी आणि आरोपींची झटापट आरोपींच्या घरात झाली व त्यामधून मला जखमा झाल्या आहेत.

२९. मी पोलीसांना फिर्याद देताना व फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १६४ चे बयाण देताना असे सांगितल होते की, 'विजय रामराव गायकवाड, त्यांची पत्नी वैशाला विजय गायकवाड यांनी मला शिवीगाळी करुन दगड मारण्यास सुरवात केली.' सदर बाब माझ्या फिर्यादमध्ये नमुद नसण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

३०. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या विरुद्ध आरोपी याने तक्रार दाखल केली आहे म्हणून मी मध्यरात्री जावून आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/०६/२०२१ रोजी संध्याकाळी पाच वाजता मला दगड फेकून मारहाण केली आणि संध्याकाळी ८.०० वाजता मला व माझ्या कुटूंबियांना कु-हाड व काठयाने मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ विजय व त्यांची पत्नी आरोपी क्र. ५ वैशाली हे दिनांक ०६/०६/२०२१ रोजी मुंबई येथे ट्रान्सपोर्ट व्यवयाय असल्याने मुंबई येथे होते, शेटफळे येथे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ व ५ हे घटनास्थळी नसताना आरोपी कुटूंबावर दबाव आणण्याकरीता त्यांची नावे जाणीवपूर्वक नमुद केली आहेत. आम्हाला मारहाण झाल्यानंतर आरोपी क्र. ३ रामराव परत त्यांच्या घरी जात असताना त्यांच्या घराजवळ असलेल्या नाल्यामध्ये पडून त्यांना जखमा झाल्या होत्या. संजय यास जखम झाली नव्हती त्यामुळे मला त्याच्या जखमेबाबत कोणता खुलासा द्यायचा नाही. आरोपी क्र. ३ पडले होते असे मला समजले होते. मी पोलीसांना आरोपी क्र. ३ यांना जखम झाल्याबाबत कळविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींनी कु-हाड, काठी व

**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ३१**

लाथाबुक्क्यांनी कधीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्याविरुद्ध केलेल्या तक्रारीला शह देण्याकरीता प्रस्तुतची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**आरोपी क्र. १, २, ४ व ५ करीता विधीज्ञ जे.एम महामुनी वकील यांच्यामार्फत उलटतपास सुरु –**

आरोपी क्र. ३ ने केलेला उलटतपास स्वीकारला.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.06.06 11:00:01 +0530

दि. ०५/०६/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी